आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१ जून २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- भारतविरोधी कारवायांसाठी म्यानमांची भूमी वापरू देणार नाही, अशी मान्यमां च्या अध्यक्षांची ग्वाही

- विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, जवळपास सर्वच पक्षात बंडखोरी

- व्यावसायिक वापराच्या आणि ५ किलो वजनाच्या एलपीजी सिलेंडरच्या किंमतीत वाढ

आणि

- आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर

<><><><>

भारतविरोधी कारवायांसाठी म्यानमांची भूमी वापरू दिली जाणार नाही अशी हमी म्यानमांचे अध्यक्ष यु मिन उंग लाईंग यांनी नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा दरम्यान दिली. दुर्मीळ खनिज पुरवठ्याच्या मुद्द्यावरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली आणि परस्परसहकार्यावर सहमती झाली. याशिवाय व्यापार, संरक्षण, सीमाप्रदेश व्यवस्थापन, विकासविषयक सहाय्य आणि सांस्कृतिक देवाण घेवाण अशा विविध मुद्द्यांवर तपशीलवार चर्चा झाली, असं परदेश व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्त्री यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. ऊर्जा, गुंतवणूक, आरोग्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रात निकटतम सहकार्याची गरज दोन्ही पक्षांनी अधोरेखित केली. सध्या उभय देशांदरम्यानचा व्यापार २ अब्ज डॉलर्सच्या आसपास आहे.

यु मिन उंग लाईंग ५ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले असून आज त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. ते उद्या मुंबईत येणार असून उद्योगजगतातल्या अग्रणींना भेटणार आहेत.

<><><><>

भारत आणि अमेरिकेनं द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यातल्या बहुतांश बाबींना अंतिम स्वरूप दिलं असून, आता काही किरकोळ मुद्द्यांवर वाटाघाटी सुरु आहेत.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. या कराराच्या पहिल्या टप्प्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी चर्चा करण्याकरता अमेरिकी शिष्टमंडळ दिल्लीत आलं असून ही चर्चा २ ते ४ जून दरम्यान होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

अंतिम स्वरूप देताना, अमेरिकेत झालेले कायदेशीर बदल अंतिम करारामध्ये कसे प्रतिबिंबित होतील आणि त्यानुसार कोणत्या प्रकारचे बदल केले जातील, यावरही चर्चा सुरू आहे. आम्ही शक्य तितक्या लवकर या कराराचा पहिला टप्पा पूर्ण करू, त्यावर स्वाक्षरी करू आणि अधिक व्यापक करार कसा बनवता येईल यावर पुढची चर्चा सुरू करू, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारत-ओमान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार आजपासून अंमलात आला आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी ही घोषणा केली. सहा महिन्यांपूर्वी या करारवर स्वाक्षऱ्या झाल्या होत्या. हा केवळ एक व्यापारी करार नाही, तर तो सांस्कृतिक विश्वासाचे प्रतीक आहे. या करारामुळे पहिल्या दिवसापासून भारताच्या ९८ टक्के वस्तूंना ओमानमध्ये शुल्कमुक्त प्रवेश मिळेल. वस्त्रोद्योग, खेळताना घालण्याचे कपडे, कृषी उत्पादनं, औषधं आणि वैद्यकीय उपकरणं, चामड्याच्या वस्तू, ऑटोमोबाईल, सागरी उत्पादनं यांसारख्या विविध क्षेत्रांमधे भारतातल्या कामगार, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, आणि निर्यातदारांना ओमानच्या बाजारपेठेत प्राधान्यानं प्रवेश मिळेल, असं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या संरक्षण मंत्र्यांमध्ये आज नवी दिल्लीत चर्चा झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि ऑस्ट्रेलियाचं संरक्षण खातं सांभाळणारे तिथले उपप्रधानमंत्री रिचर्ड मार्लेस यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. हिंद-प्रशांत महासागर क्षेत्र मुक्त, खुलं, शांत, स्थिर आणि समृद्ध रहावं याकरता सहकार्य करण्यावर बैठकीत सहमती झाली. दोन्ही देशांच्या नौदलांच्या हालचालींबाबत तसंच तटरक्षक दलाबरोबरच्या समन्वयाबाबत चर्चा झाली. संरक्षण सामुग्री आणि सेवांच्या देवाण घेवाणीबाबत समझोता करार करण्याचा निर्णयही झाल्याचं बैठकीनंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. जवळपास सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाल्यानं गुरुवारी अर्ज माघारीची मुदत संपल्यावर निवडणुकीचं चित्र स्पष्ट होणार आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(विधानपरिषदेच्या वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, अमरावती, सांगली - सातारा, सोलापुर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर-जालना, नांदेड, बीड-लातूर-धाराशिव, जळगाव, ठाणे, नाशिक, परभणी, यवतमाळ, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे आणि नागपूर या मतदारसंघासाठी ही निवडणूक होते आहे. महायुतीकडून भाजपा ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेस ८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तीन जागा लढवणार आहे, असं या पक्षांनी जाहीर केलं होतं.*

*पुणे मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांनी अर्ज दाखल केला. त्याशिवाय सुनील टिंगरे यांनीही अर्ज भरला आहे. दोघांकडे एबी फॉर्म असल्यानं अधिकृत उमेदवार कोण यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. नाशिकमधून शिवसेनेच्या नरेंद्र दराडे यांनी आज दुपारी अर्ज दाखल केला. तसंच भाजपा नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उमेदवार न देण्याचा निर्णय आज पत्रकार परिषदेत जाहीर केला. मात्र कोणत्या उमेदवाराला पाठिंबा देणार हे ठाकरेंच्या पक्षानं अद्याप जाहीर केलं नाही.*

*छत्रपती संभाजीनगर - जालना मतदारसंघासाठी महायुतीकडून सुहास शिरसाट यांनी तर महाविकास आघाडी कडून देवयानी पाटील डोणगावकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सिल्लोड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष समीर अब्दुल सत्तार यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. यवतमाळमधे काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघात महायुतीत बंडखोरी झाली असून तिन्ही पक्षांनी आपापले उमेदवार उभे केले आहेत. शिवसेनेकडून दुष्यंत चतुर्वेदी,भाजपाकडून नितीन भुतडा तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून साजिद बेग यांना उमेदवारी देण्यात आली आहे.*

*रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे, तसंच शेकापचे अरविंद म्हात्रे यांच्यासह मानसी म्हात्रे, अनिल चोपडा यांनीही अर्ज दाखल केले. जुईली दळवी यांनी अपक्ष अर्ज  दाखल केला. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून या मतदारसंघासाठी सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने  यानी अर्ज दाखल केला.*
*महायुतीमधे  कोणतेही मतभेद नसून सर्व जागा महायुती जिंकेल,  असा विश्वास महसूलमंत्री आणि भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनीही व्यक्त केला आहे. महायुतीचे घटक पक्ष एकत्र येऊन चर्चा करतील आणि बंडखोर  उमेदवारांचे अर्ज  मागे घेतील असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. या निवडणुकीसाठी २२ जून रोजी मतदान होणार असून त्याचदिवशी मतमोजणी होईल.)*

**<><><><><>**

व्यावसायिक वापरासाठीच्या सिलेंडरच्या दरांमध्ये वाढ झाली आहे. घरगुती वापरासाठीच्या गॅसच्या दरात बदल झालेला नाही. १९ किलो वजनाचा सिलेंडर मुंबईत साडे ४३ रूपयांनी महागला असून  त्याची किंमत ३ हजार ६७ रूपये ५० पैसे झाली आहे. पाच किलोग्रम वजनाच्या छोट्या गॅस सिलेंडरच्या दरात ११ रूपये वाढ झाली आहे.

दरम्यान, केंद्र शासनाने आजपासून पेट्रोल, डिझेल आणि एटीएफ म्हणजे विमान इंधनावरचा निर्यात कर कमी केला आहे. पेट्रोलच्या निर्यातीवरील विंडफॉल गेनवरचा कर निम्म्यावर आणून १ रूपया ५० पैसे प्रतिलीटर, तर डिझेल १३ रूपये ५० पैसे प्रतिलीटर आणि एटीएफवरचा कर ९ रूपये ५० पैसे प्रतिलीटर केला आहे.

**<><><><><>**

एलपीजी, पेट्रोल, डिझेलच्या विक्री आणि वितरणातली अनियमितता, काळाबाजार, आणि साठेबाजीविरुद्ध दक्षता वाढवण्याचं आवाहन केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना केलं आहे. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी ही माहिती दिली. गेल्या तीन दिवसात १ हजार ३०० ठिकाणी छापे टाकण्यात आले, तसंच सात जणांना अटक केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यंदा ५६ हजार ८८० विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरले असून त्यात १० हजार १०७ विद्यार्थिनी आहेत.

आयआयटी दिल्ली विभागातला शुभम कुमार ३६० पैकी ३३० गुण मिळवून देशात सर्वप्रथम आला आहे. विद्यार्थिनींमधे दिल्ली विभागातली आरोशी देशपांडे पहिली आली आहे. तिला २८० गुण मिळाले असून सर्वसाधारण यादीत ती ७७व्या क्रमांकावर आहे. विद्यार्थ्यांना जेईईएडीव्ही.एसी. इन या संकेतस्थळावर निकाल पाहता येतील.

<><><><>

पश्चिम बंगाल राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार आज झाला, यावेळी ३५ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यापैकी १३ जणांनी कॅबिनेट, १९ जणांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली तसंच तीन जणांनी राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार म्हणून शपथ घेतली. लोकभवन इथं झालेल्या सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवी  यांनी सर्वांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. नवनियुक्त मंत्र्यांना येत्या बुधवारी खातेवाटप केलं जाईल असं कॅबिनेट मंत्री तपस रॉय यांनी बातमीदारांना सांगितलं. याआधी मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांच्यासह पाच कॅबिनेट मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती.

<><><><>

तृणमूल काँग्रेसचे आमदार संदीपान साहा आणि ऋतुब्रत बॅनर्जी यांना पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे निलंबित करण्यात आलं आहे. तृणमूल काँग्रेसचे नेते शोभनदेव चटोपाध्याय यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यासाठी आमदारांच्या खोट्या सह्या केल्याची तक्रार  बॅनर्जी आणि साहा यांनी दाखल केल्याची माहिती मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांनी वार्ताहर परिषदेत आज दिली, त्यानंतर अवघ्या एका तासात तृणमूल काँग्रेसकडून ही कारवाई केली गेली.

<><><><>

सीबीआयनं आज रिलायन्स कम्युनिकेशन्सचे माजी समुह व्यवस्थापकीय संचालक अमिताभ झुनझुनवाला यांना अटक केली. बँकांकडून घेतलेल्या १९ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या कर्जाचा गैरवापर केल्याप्रकरणी ही कारवाई झाली आहे.

//<><><><>//